तथापि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गातील जे अधिकारी सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० या वेतन स्तरामध्ये वेतन आहरित करतात, त्यांचे पुढील पदोन्नती साखळीतील पद उपसंचालक असून ते एस-२३ या वेतनस्तरामध्ये येते. याबाबत शासन वित्त विभागाने दि.०२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये “सहायक संचालक पदावरील अधिकाऱ्यास विद्यमान एस-२० या वेतनस्तरानंतर पदोन्नतीच्या साखळीत (In Promotional Hierarchy) एस-२३ या वेतनस्तरामध्ये उपसंचालक हे पद असल्याने, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्रता आजमावल्यानंतर, पात्र ठरत असल्यास, संबंधितास वेतनस्तर एस-२३ मध्ये अनुज्ञेय लाभ मंजूर करता येईल”. अशी मान्यता दिलेली आहे.

सहायक संचालक संवर्गात कार्यरत असणाऱ्या ज्या अधिकाऱ्यांना यापूर्वीच्या योजनांनुसार नियमित सेवेची १२ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी सहायक संचालक संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे, अशा अधिकाऱ्यांची सहायक संचालक संवर्गातील तदर्थ पदोन्नती वित्त विभागाच्या दि.२४.११.२०२१ रोजीच्या आदेशान्वये नियमित करण्यात आली आहे.

वित्त विभाग स्पष्टीकरण दि.०२.११.२०२० मध्ये पुढीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे : “लेखा अधिकारी पदार नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यास १२ वर्षांची सेवा पूर्ण होण्यापूर्वीच सहायक संचालक या पदावर कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यामुळे त्यास तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ हा शासन निर्णय, वित्त विभाग, दि.०२.०३.२०१९ मधील परिच्छेद क्र.(i) (ii) (iii) व (iv) मधील तरतुदींनुसार सदर पदोन्नतीच्या नियमित दिनांकापासून १० वर्षे इतकी नियमित सेवा पूर्ण झाल्यानंतर विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्रता आजमावून पात्र ठरल्यास अनुज्ञेय ठरेल”.

त्यानुसार उपरोक्त शासन आदेश दि.२४.११.२०२१ मध्ये नमुद अधिकाऱ्यांपैकी पुढील तक्त्यात नमुद अधिकाऱ्यांना सहायक संचालक संवर्गात १० वर्षे इतकी नियमित सेवा पूर्ण झाली आहे. त्यामुळे सदर अधिकाऱ्यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत उपसंचालक संवर्गाच्या वेतनश्रेणीचा लाभ हा शासन सेवेतील पहिला लाभ म्हणून अनुज्ञेय करण्यात त्यांच्या नावासमोर स्तंभ - ६ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | म.वि.व ले. सेवेतील लेखा अधिकारी गट-ब संवर्गातील नियुक्तीचा दिनांक | तदर्थ पदोन्नतीच्या (सहायक संचालक संवर्ग) पदावरील रुजू दिनांक | तदर्थ पदोन्नती नियमित केल्याचा दिनांक | तीन लाभांच्या योजनेनुसार पहिला लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक (पदोन्नती नियमित केल्यापासून १० वर्षे) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री.शेखर बा.कुलकर्णी | ०१.०२.१९९९ | ०३.०६.२०१० | ०१.०९.२०११ | ०१.०९.२०२१ |
| २. | श्री.रविंद्र बा.चव्हाण | ०१.०२.१९९९ | २१.०६.२०१० | ०१.०९.२०११ | ०१.०९.२०२१ |
| ३. | श्री.आनंदकुमार बिं.जोशी | ०१.०२.१९९९ | १०.०८.२०१० | ०१.०९.२०११ | ०१.०९.२०२१ |
| ४. | श्री.विठ्ठल गं.सुडे | ०१.०२.१९९९ | १५.०६.२०१० | ०१.०९.२०११ | ०१.०९.२०२१ |
| ५. | श्री.मनजित भा.गोरेगांवकर | ०१.०२.१९९९ | ०४.०६.२०१० | ०१.०९.२०११ | ०१.०९.२०२१ |

